गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!
परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 65 | गुरुवार दि. 19 मार्च 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## नमो शेतकरी महासन्मान निधीचा 8 वा हप्ता 'या' दिवशी होणार खात्यात जमा

### 8वा हप्ता पुढील आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात होणार जमा




राज्यातील शेतकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नमो शेतकरी महासन्मान निधीच्या 8 व्या हप्त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद केली होती. गेल्या अनेक दिवसांपासून थकलेल्या नमो शेतकरी योजनेच्या आठवा हप्त्याच्या वितरणाला सरकारने मंजुरी देत शासन निर्णय जारी केला होता. तर यासाठी 1 हजार 774 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. आता 8 वा हप्ता पुढील आठवड्यात थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.केंद्र सरकारच्या पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्यात महायुती सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजना सुरु केली. तर पीएम किसान सन्मान निधी योजनेचा हप्ता वितरीत केल्यानंतर एका आठवड्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा हप्ता दिला जातो. मात्र पण पीएम किसानचा 21 वा हप्ता नोव्हेंबर महिन्यात वितरीत झाल्यानंतरही नमोचा आठवा हप्ता जमा झाला नाही.दरम्यान राज्यातील पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी नमो शेतकरी महासन्मान निधीच्या 8 व्या हप्त्यासाठी तरतूद केली. याबाबत शासन निर्णय जारी करत रु. 1,774 कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. पण प्रत्यक्षात 1, 820 कोटी इतकी रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. यामुळे गेल्या तीन महिन्यापासून वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांना आता दिलासा मिळाला आहे.राज्य सरकारने निधी वितरणास मान्यता देताना तो कधी दिला जाईल याची माहिती दिली नव्हती. पण आता याबाबत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी माहिती दिली आहे. त्यांनी नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा 8 वा हप्ता पुढील आठवड्यात थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याचे सांगितले आहे. तसेच राज्यातील सुमारे पान 3 वर

### बीड जिल्ह्यातील गुलजार – ए – रजा या संस्थेमार्फत सुमारे साडेचार कोटी रुपयांचा गैरव्यवहार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली माहिती

मुंबई : बीड जिल्ह्यातील गुलजार – ए – रजा या संस्थेमार्फत सुमारे साडेचार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाला आहे. हा पैसा देशविघातक कारवायांसाठी वापरला गेल्याचा संशय आहे. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाकडून चौकशी केली जाणार आहे. चौकशीचा अहवाल आल्यानंतर कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.



विक्रम काळे यांनी या बाबतचा प्रश्न उपस्थित केला होता. पात्रुड (ता. माजलगाव) येथील गुलजार – ए – रजा नावाने बनावट ट्रस्ट स्थापन करुन गुन्ह्यातील आरोपींनी अन्य संस्थांचा नोंदणी क्रमांक वापरुन धार्मिक कार्याच्या नावाखाली देणगी म्हणून लोकांकडून विविध बँक खात्यात सुमारे 4 कोटी 73 लाख 67 हजार 503 रुपयांची रक्क पान 3 वर

## आज ठळक

### नारायणराव माने यांचे दु:खद निधन

### शिवसेना शहर प्रमुख वैजनाथ माने यांना पितृशोक



परळी वैजनाथ (प्रतिनिधी): शहरातील सावतामाळी मंदिर भागातील जुने जाणते तथा प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व कै. नारायणराव तुकाराम माने यांचे बुधवार दि. 18 मार्च 2026 रोजी पहाटे 3.25 वाजता वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय अंदाजे 90 वर्ष होते. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिवसेनेचे शहर प्रमुख वैजनाथ माने यांचे ते वडील होत.

याबाबत अधिक माहिती अशी की, कै. नारायणराव माने हे मनमिळाऊ स्वभावाचे व कष्टाळू व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वपरिचित होते. साधेपणा, धार्मिक वृत्ती, सामाजिक भान, अशा स्वभाव गुणामुळे त्यांची जुन्या गावभागात स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. ते येथील गोविंद माने तसेच शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख वैजनाथ माने यांचे वडील होत. बुधवार दिनांक 18 मार्च 2026 रोजी पहाटे 03 : 25 वाजता राहत्या घरी वृद्धापकाळाने त्यांची प्राणज्योत पान 3 वर

## पर्यावरण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांना नोटीस

### सभागृहात मंत्री पंकजा मुंडे यांची माहिती




मुंबई, दि. 18 : चंद्रपूर जिल्ह्यात वाढत्या औद्योगिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर विविध उद्योगांवर कारवाई करण्यात आली आहे. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उद्योगांना नोटिसा बजावण्यात आल्या असल्याची माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला. पान 3 वर

## आज गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 'वैद्यनाथ मिल्क अँड प्रॉडक्टचा फुलचंद कराड यांच्या हस्ते होणार भव्य शुभारंभ

### शेतकरी-ग्राहकांना थेट होणार फायदा



परळी वैजनाथ,(प्रतिनिधी):- गुढीपाडव्याच्या पवित्र पर्वावर परळी शहरात दुग्ध व्यवसायाला नवे बळ देणारा उपक्रम साकारत आहे. परळी तालुका दूध व्यवसायिक संघ मर्या., परळी वैजनाथ यांच्या माध्यमातून 'वैद्यनाथ मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट' या डेअरी प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, दि. 19 मार्च 2026 रोजी सकाळी 10 वाजता आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्थानिक दूध उत्पादकांना योग्य बाजारपेठ मिळावी आणि ग्राहकांना शुद्ध, ताजे दूध व दुग्धजन्य पदार्थ थेट उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने हे फर्म सुरु करण्यात येत आहे. उत्पादक ते थेट ग्राहक या संकल्पनेवर आधारित असलेला हा प्रकल्प परळी परिसरातील दुग्ध व्यवसायाला नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त होत आहे. भगवान सेनेचे सरसेनापती तथा शिवसेना शिंदे गटाचे महाराष्ट्र समन्वयक, परळी तालुका दूध संघाचे चेअरमन श्री. फुलचंद पान 3 वर

## प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत परळीत गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 677 घरकुल लाभार्थ्यांना पहिला हप्ता होणार प्रदान

- ना.पंकजाताई मुंडे व आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरण व शुभारंभ



परळी वैजनाथ | प्रतिनिधी...

प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत परळी शहरातील तब्बल 677 लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर होणार आहे. सर्वांसाठी निवारा हे उद्दिष्ट घेऊन प्रत्येकाच्या डोक्यावर हक्काचे छत असावे या दृष्टिकोनातून परळी नगर परिषदेच्या माध्यमातून 677 लाभार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत गुढीपाडव्याच्या दिवशी दि. 19 रोजी पहिला हप्ता वितरित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर रमाई घरकुल



आवास योजनेच्या नवीन मंजूर दोनशे प्रस्तावांचा शुभारंभ आणि 546 दिव्यांगांना पान 3 वर

## महसूल खात्यात 'शुद्धलेखन' दुरुस्तीच्या नावाखाली प्रचंड मोठा घोटाळा!



राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरु आहे. या अधिवेशनात आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. यादरम्यान राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेच्या सभागृहात त्यांच्याच विभागात झालेल्या एका घोटाळ्याबद्दल माहिती दिली आहे. महसूल खात्यात प्रचंड मोठा घोटाळा झाल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषद सभागृहात दिली. शुद्धलेखनात बदल करण्याच्या नियमाचा वापर करून एका व्यक्तीची जमीन पान 3 वर

## गुढी पाडव्याच्या सुवर्णमुहूर्तावर 'बचपन प्ले स्कूल'ची दमदार एन्ट्री

### 'गोल्डन ॲडमिशन डे'त मोफत स्कूल किटची अनोखी मेजवानी




परळी / प्रतिनिधी-

नवीन वर्षाच्या मंगल प्रारंभाचे प्रतीक असलेल्या गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर, डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु होत असलेल्या बचपन प्ले स्कूलने शिक्षण क्षेत्रात आकर्षक व पालकांसाठी लाभदायक अशी "Golden Admission Day" ऑफर जाहीर करत दमदार एन्ट्री केली आहे. लहानग्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पहिली पायरी ठरणाऱ्या या उपक्रमामुळे पान 3 वर






https://www.parlisangharshneta.in

परळी संघर्षनेता

गुरुवार दि. 19 मार्च 2026



# कु.मनवा वाव्हळचे नवोदय परीक्षेत दैदिप्यमान यश



वडवणी,दि.18(प्रतिनिधी):- खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथील विद्यार्थिनी तसेच वडवणी येथील ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने नुकत्याच जाहीर झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश पूर्व परीक्षेत दैदिप्यमान असे यश संपादन केले आहे.संपूर्ण जिल्ह्यातून या परीक्षेत 17 व्या रँकनूसार व 97 टक्के गुणांसह मनवा व्हावळ नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. तिच्या या यशाबध्दल तिचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शिक्षण क्षेत्रामध्ये अतिशय प्रतिष्ठित अशा समजल्या जाणाऱ्या व केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली असलेले बीड जिल्ह्यातील एकमेव असलेल्या नवोदय विद्यालय गढी या विद्यालयामध्ये इयत्ता सहावी प्रवेश पूर्व परीक्षा डिसेंबर 2025 मध्ये संपन्न झाली होती. या परीक्षेचा निकाल मंगळवारी ऑनलाईन पध्दतीने जाहीर झाला. या परीक्षेत माजलगांव तालुक्यातील दिंद्रुड येथील खोलेश्वर विद्यालय याठिकाणी इयत्ता पाचवी वर्गात शिक्षण घेत असलेली कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने आपल्या गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली कुशाग्र बुध्दीमत्तेच्या बळावर परीक्षेत दैदिप्यमान असे यश मिळवत संपूर्ण जिल्ह्यातून या परिक्षेत 17 व्या रँकनूसार व 97 टक्के गुणांसह नवोदय विद्यालयातील आपल्या प्रवेशासाठी ती पात्र ठरली आहे. कु.मनवा ही वडवणी येथील दै.झुंजार नेताचे पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांची नात व सहशिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची मुलगी आहे. तिच्या या यशामागे तिचे कुटुंबीय पालक तसेच आजवर तिला प्रत्येक ठिकाणी उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून लाभलेले किर्ती बाल शिक्षण केंद्र, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग वडवणी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोन्नाखोटा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोटानाईक तांडा, राजमाता मार्गदर्शन केंद्र वडवणी, व खोलेश्वर विद्यालय दिंद्रूड येथील तिचे सर्व गुरुजन वर्ग यांचे परिश्रम आहेत. या यशाचे सर्व श्रेय त्यांनाच जाते. तिच्या यशाबध्दल तिचे शाळेतील सर्व गुरुजन वर्ग तसेच वडवणी व तालुक्यातील पत्रकारिता, शिक्षण क्षेत्रासह सर्वच क्षेत्रातील त्यांचे स्नेहीजन यांनी कु.मनवा हिचे अभिनंदन करुन तिला तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# यश इंटरनॅशनल सीबीसी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची यशाची परंपरा कायम

## श्रेयस घोडकेने नवोदय परीक्षेत 94% गुण घेऊन उत्तीर्ण



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

यश इंटरनॅशनल सीबीसी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, दिंद्रुड येथील होतकरू विद्यार्थी श्रेयस छत्रभुज घोडके यांनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या यशस्वी परंपरेला उजाळा दिला आहे. 15 डिसेंबर 2025 रोजी घेण्यात आलेल्या जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत श्रेयसने 94% गुण मिळवत उत्तुंग भरारी घेतली असून आपल्या यशाने शाळेचे नाव नवलौकिक केले आहे.

अत्यंत गरीब कुटुंबातील असलेल्या श्रेयससाठी ही वाटचाल सोपी नव्हती. मर्यादित साधनसामग्री, प्रतिकूल परिस्थिती आणि अनेक अडचणींना सामोरे जात असताना देखील त्याने शिक्षणाबद्दलची ओढ कायम ठेवली. रोजच्या अभ्यासात सातत्य राखत, वेळेचे योग्य नियोजन करत आणि प्रत्येक विषयात सखोल तयारी करत त्याने आपल्या ध्येयाकडे वाटचाल केली.

यश इंटरनॅशनल सीबीसी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमधील सर्व शिक्षकांनी श्रेयसला योग्य मार्गदर्शन दिले. शिक्षकांच्या सततच्या प्रोत्साहनामुळे त्याच्या आत्मविश्वासात वाढ झाली आणि त्याने नवोदय परीक्षेची तयारी अधिक सक्षमपणे पूर्ण केली. शाळेतील शैक्षणिक वातावरण, अभ्यासक्रमाची काटेकोर अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांवर दिला जाणारा वैयक्तिक लक्ष यामुळे श्रेयससारख्या विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी मिळत आहे.

श्रेयसच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री प्रदीपजी खाडे यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी श्रेयसच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत असेच परिश्रम आणि जिद्द कायम ठेवण्याचा सल्ला दिला. तसेच, अशा यशस्वी विद्यार्थ्यांमुळे संस्थेचा गौरव वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. या यशानिमित्त शाळेच्या वतीने श्रेयसचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. सर्वांनी श्रेयसच्या मेहनतीचे कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून इतर विद्यार्थ्यांसाठीही तो प्रेरणास्थान ठरत आहे.

श्रेयस छत्रभुज घोडके याचे हे यश केवळ त्याच्या वैयक्तिक प्रगतीचे प्रतीक नसून, जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्यास कोणतीही अडचण अडथळा ठरत नाही याचे जिवंत उदाहरण आहे. यश इंटरनॅशनल सीबीसी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज भविष्यातही अशा गुणवंत विद्यार्थ्यांना घडवत राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आहे. त्याच्या या यशामुळे संस्थेचा गौरव वाढला आहे. भविष्यातही तो असेच यश संपादन करेल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष प्रदीप खाडे यांनी व्यक्त केला आहे.

# गुढीपाडवा : बदलत्या काळातील स्वरूप

डॉ. भारत कऱ्हाड



महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत गुढी पाडवा हा सण अत्यंत महत्त्वाचा आणि मंगलमय मानला जातो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा होणारा हा दिवस हिंदू नववर्षाची सुरुवात दर्शवतो आणि नवचैतन्य, आशा व सकारात्मकतेचा संदेश देतो. सणाचा विचार केवळ धार्मिक चौकटीत न करता अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तर्कशास्त्र, परंपरा, रुढी आणि आधुनिकता यांच्या संदर्भात केल्यास त्याचे व्यापक आणि सखोल स्वरुप स्पष्ट होते.

धार्मिक दृष्टीने पाहता, श्रीराम यांच्या रावणावरील विजयाचे प्रतीक म्हणून गुढी उभारली जाते, तर ब्रह्मदेव यांच्या सृष्टीनिर्मितीची संकल्पना या दिवशी मानली जाते. त्यामुळे हा दिवस विजय, नवसृजन आणि शुभारंभाचे प्रतीक ठरतो. गुढी ही "ब्रह्मध्वज" म्हणून ओळखली जाते आणि ती समृद्धी, यश आणि सकारात्मकतेचे प्रतीक आहे.

परंपरा आणि रुढींच्या दृष्टीने गुढी पाडवा हा सातत्याचा सण आहे. गुढी उभारणे, घराची स्वच्छता, रांगोळी, कडुनिंब-गूळ सेवन आणि पारंपरिक पदार्थांची तयारी या गोष्टी पिढ्यानपिढ्या चालत आल्या आहेत. मात्र आधुनिक शहरी जीवनशैलीमुळे या परंपरांमध्ये बदल होत आहेत. फ्लॅट संस्कृतीमुळे अनेक कुटुंबे घराबाहेर गुढी उभारण्याऐवजी घराच्या आत, टेबलावर गुढी ठेवून पूजा करतात. या बदलातून स्पष्ट होते की परंपरा बदलू शकते, पण तिच्यामागील मूल्ये कायम राहतात.

समाजशास्त्रीय दृष्टीने गुढी पाडवा हा एकात्मतेचा सण आहे. कुटुंबीय, मित्र



आणि शेजारी एकत्र येऊन आनंद साजरा करतात, नातेसंबंध दृढ करतात आणि समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात. तथापि, आधुनिक काळात तरुणाईचा प्रतिसाद काही प्रमाणात कमी होत असल्याचे दिसते. व्यस्त जीवनशैली, डिजिटल माध्यमांचा प्रभाव, पाश्चिमात्य संस्कृतीचे आकर्षण आणि सणामागील अर्थाबद्दलची अपुरी माहिती ही यामागील प्रमुख कारणे आहेत. तरीही काही तरुण पर्यावरणपूरक सण, सामाजिक उपक्रम आणि आधुनिक पद्धतीने सण साजरे करून नव्या दृष्टिकोनातून परंपरा जपण्याचा प्रयत्न करत आहेत.

अर्थशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर गुढी पाडवा हा स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणारा सण आहे. बाजारपेठांमध्ये खरेदी-विक्री वाढते, ज्यामुळे व्यापारी, शेतकरी आणि कारागीर यांना उत्पन्न मिळते. सण हे आर्थिक चक्राला गती देतात आणि समाजातील विविध घटकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करतात.

तर्कशास्त्रीय आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून हा सण वसंत ऋतूच्या सुरुवातीला येतो, जेव्हा निसर्गात नवचैतन्य निर्माण होते. कडुनिंब आणि गूळ सेवन आरोग्यासाठी उपयुक्त आहे, घराची स्वच्छता आणि सजावट आरोग्यदायी वातावरण निर्माण करते. गुढीत वापरले जाणारे नैसर्गिक घटक पर्यावरणाशी सुसंवाद साधण्याचा संदेश देतात.

याचबरोबर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो—सर्व धर्मांचे लोक हा सण साजरा का करत नाहीत? याचे उत्तर विविधतेत दडलेले आहे. गुढी पाडवा हा हिंदू परंपरेशी निगडित सण असल्यामुळे प्रत्येक धर्माचे लोक आपापल्या श्रद्धेनुसार वेगवेगळे सण साजरे करतात. जसे इतर धर्मांचे सण स्वतंत्रपणे साजरे केले जातात, तसेच हा सणही विशिष्ट सांस्कृतिक आणि धार्मिक चौकटीत राहतो. तथापि, आजच्या काळात एकमेकांच्या सणांबद्दल आदर, शुभेच्छा आणि काही प्रमाणात सहभाग वाढताना दिसतो, ज्यामुळे सामाजिक ऐक्य अधिक दृढ होते.

अशा प्रकारे गुढी पाडवा हा धर्म, परंपरा, समाज, अर्थव्यवस्था, विज्ञान आणि सांस्कृतिक विविधता यांचा सुंदर संगम आहे. तो आपल्याला केवळ सण साजरा करण्याची नाही, तर जीवनाकडे समतोल, तर्कसंगत आणि सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची शिकवण देतो.

"विविधतेत एकता आणि परंपरेत आधुनिकता—हीच गुढी पाडव्याची खरी ओळख आहे."

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,**
**वराडकर महाविद्यालय, दापोली,**
**जिल्हा रत्नागिरी.**

# गुढीपाडवाः संपूर्ण सृष्टीसाठी शुभ,समृद्ध, नवचैतन्य व मांगल्याचे प्रतीक.

फाल्गुन महिना म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा महिना व यात होळी/धुलीवंदन म्हणजे जुन्या वर्षीचा शेवटचा सण साजरा करुन संपणाऱ्या वर्षाला निरोप दिला जातो व नवीन वर्षाच स्वागत केले जाते.फाल्गुन नंतर चैत्र महिना लागतो हा महिना म्हणजे मराठी माणसासाठी नवीन वर्षाची सुरुवात म्हणजेच नवचैतन्य.हिंदु धर्मासाठी व मराठी माणसांसाठी गुढीपाडवा अत्यंत महत्वाचा सण म्हणुन साजरा केला जातो. गुढीपाडव्याचे संपूर्ण शुभ संकेत पुरातन काळापासून आपल्याला पहायला मिळतात. कारण गुढी हे समृध्दी, मांगल्य, चैतन्य व विजयाचे प्रतिक आहे. हिंदू दिनदर्शिके प्रमाणे चैत्र शुद्ध प्रतिपदेला "गुढीपाडवा"सण साजरा करतो.आपल्या दाराशी गुढी उभारुन समाजाला व जगाला विजयाचे आणि समृद्धीचे प्रतिक दर्शविण्यात येते.गुढी म्हणजे उत्सवाचे मोठे प्रतिकच!कारण याच दिवशी म्हणजे चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रभू रामचंद्रांनी वालीचा वध करुन त्याच्या छळापासुन प्रजेला मुक्त केले.त्याचप्रमाणे रामाने असुरी शक्तीचा नायनाट केला.याच दिवशी प्रभूरामचंद्रांचा वनवास संपला होता म्हणून हा दिवस आनंदोत्सवाचा दिवस मानण्यात येतो.याच दिवशी ब्रम्हदेवाने सृष्टी निर्माण केली हाच तो पवित्र दिवस. भगवान विष्णूंनी मत्स्य रुप धारण करून याच दिवशी शंकासुरचा वध केला. चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून श्री शालिवाहन राजाने शके गणनेला सुरुवात केली. शालिवाहनाने मातीचे सैन्य तयार केले त्यावर पाणी शिंपडून मातीच्या सैन्यात प्राण भरला.मग या सैन्याच्या मदतीने त्याने शत्रूंचा पराभव केला अशी आख्यायिका सुध्दा आहे.अशा प्रकारे पुरातन काळापासून आजपर्यंत विजयी दिवस म्हणून गुढीपाडव्याचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.आजच्या दिवशी घरा-घरामध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे या उद्देशाने गुढी उभारताना चांदीच्या किंवा तांब्याच्या किंवा पितळीचा लोटा, गोडवा निर्माण व्हावा म्हणून गाठी, शांतीच प्रतीक म्हणून आंब्याची डाहळी,कडु निंबाची डहाळी औषधीचे प्रतिक म्हणून, गुढीमध्ये नवे कापड इत्यादींच्या माध्यमातून गुढी उभारुन गुढीपाडवा सण साजरा केला जातो. या मागचा एकच उद्देश असतो की सर्वांचे आरोग्य सुदृढ रहावे, नवचैतन्य निर्माण व्हावे आणि मराठी नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने व्हावी व खेळीमेळीचे वातावरण निर्माण करुन सर्वांनीच प्रगतीचा उच्चांक गाठावा व आरोग्य सुदृढ आणि



निरोगी रहावे. या दिवसाला प्रत्येक जन आपल्या दारांमध्ये आंब्याच्या पानांचे तोरण बांधून व दारांसमोर रांगोळी काढून नवचैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो. गुढीपाडवा आपण नववर्षाच्या उद्देशाने साजरा करतो.कारण येणारे दिवस सुखसमाधानाचे, सुखसमृद्धीचे जावो आणि येणारी पीढा व दुःख दुर व्हावे हाच यामागचा खरा उद्देश आहे. आपल्या मनातील स्वार्थीपणाची वृत्ती नष्ट होवून नवीन वर्षापासून आपले मन शांत,स्थीर व सात्त्विक बनविण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे.हाच खरा विजयी दिवस व गुढी उभारने हे खऱ्या अर्थाने विजयाचे प्रतिक व सार्थक समजण्यात येईल.चैत्राची सुरुवात ज्या दिवसाने होते तो दिवस म्हणजे गुढीपाडवा.याच दिवसांपासून रामाचे नवरात्र सुरु होते व ते रामनवमीला संपते.या दिवसाला इतके महत्त्व आहे की हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो.आपण ज्याप्रमाणे 15 ऑगस्टला स्वतंत्र दिवस साजरा करतो. त्याचप्रमाणे गुढीपाडव्याला प्रत्येक घरावर गुढी उभारुन नवीन वर्षाची सुरुवात घराघरातुन साजरी केली जाते व आनंदोत्सव साजरा केला जातो.त्याचप्रमाणे आल्हाददायक वसंत ऋतू नंतरचा उन्हाळा बाधू नये म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच कडूनिंबाचे पाणे खावीत असे आयुर्वेद शास्त्र सांगतो. गुढीपाडवा विविध राज्यांत वेगवेगळ्या नावांनी साजरा केल्या जातो.गुढीपाडवा हा फक्त धार्मिक, सांस्कृतिक गोष्टींनीच जोडलेला नसुन त्यात निसर्गाचा व पर्यावरणाचा सूध्दा विचार केल्याचे दिसून येते. गुढीपाडव्याच्या दिवसाला मी हेच सांगु इच्छितो की प्रत्येकाने आपल्या प्रकृतीची काळजी घेवून पुढील वाटचाल करावी.मराठी नववर्ष जगावेगळे असल्याचे आपल्याला दीसुन येते.इंग्रजी नववर्षाच्या सुरुवातीला जगभर दिखावा दाखवून जल्लोष साजरा करण्यात येतो.परंतु मराठी नववर्ष संय्यमतेने, आनंदाने,आदरतीथ्याने,प्रेमाने,मान सन्माने आणि मुख्यत्वे करुन आरोग्याचा दृष्टीकोन सामोरं ठेवुन साजरा करण्यात येतो.त्यामुळे जगाचे नववर्ष व महाराष्ट्राचे नववर्ष यात जमिन आसमानचा फरक दिसून येतो.महाराष्ट्रासह भारतात बदलते हवामान लक्षात घेता व वाढते प्रदूषण पहाता आणि वाढते वनवे पहाता मराठी नववर्षाच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे.यामुळे प्रदूषणावर मात करण्यास मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मदत होईल. गुढीपाडव्याला प्रत्येकांनी वृक्षारोपण केले तर एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल. यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना सावली,मानवाला शुद्ध हवा आणि सर्वांना शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. यामुळे संपूर्ण पृथ्वीतलावर आल्हाददायक वातावरण निर्माण होईल. यातच आपल्याला खरा गुढीपाडव्याचा व नवीन वर्षाचा विजयत्सोव व आनंदोत्सव दिसून येईल. गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(स्वतंत्र पत्रकार)**



**मो.नं.9921690779,नागपूर.**

# चवदार तळे सत्याग्रह: मानवी हक्क आणि विषमतेविरुद्धचा लढा

## (20-26 मार्च: चवदार तळे सत्याग्रह दिन तथा भारतीय सामाजिक सबलीकरण दिवस विशेष.)

महाड चवदार तळे सत्याग्रह हा 20 मार्च 1927 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथे दलितांना सार्वजनिक चवदार तळ्याचे पाणी वापरण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी केलेला ऐतिहासिक सत्याग्रह होता. हा लढा केवळ पाण्यासाठी नसून मानवी हक्क आणि विषमतेविरुद्ध होता, जो सामाजिक समतेची मुहूर्तमेढ ठरला. या दिनाचे औचित्य साधून दि.20 मार्च हा भारतात "सामाजिक सबलीकरण दिन" म्हणूनही साजरा केला जातो. श्री कृष्णकुमार आनंदी- गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर महत्त्वपूर्ण व उद्बोधक संकलित लेख जरूर वाचा.... संपादक.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या रुपाने आधुनिक भारताचा पाया रचला. स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेवर आधारित भारतीय समाजाची नवरचना करण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले. या देशाला स्वातंत्र्य तर मिळेल; परंतु जातिभेद, उच्चनीचता आणि अस्पृश्यतेच्या बेड्यांमध्ये समाजातील बहुसंख्य वर्ग जखडून राहिला, तर हे स्वातंत्र्य नावापुरतेच राहण्याचा धोका त्यांना दिसत होता. हे चित्र बदलण्यासाठी बाबासाहेबांनी ज्या सामाजिक समतेच्या चळवळीची पायाभरणी केली, तिची सुरुवात महाडला झालेल्या धर्मसंगरात झाली. दि.20 मार्च 1927 रोजी त्यांनी हजारो अनुयायांसह चवदार तळ्याचे पाणी ओंजळीत घेऊन प्यायले आणि आपल्या अस्पृश्य बांधवांचा माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा मूलभूत हक्क प्रस्थापित केला. या घटनेचे स्मरण करून सामाजिक समता व ऐक्याची चळवळ सातत्याने पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आपण मागील तीन वर्षांपासून साजरा करत आहोत. स्वातंत्र्याच्या लढ्यात "राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा" असा प्रश्न सतत वेगवेगळी रूपं घेऊन आपल्यासमोर उभा राहात आला आहे. या प्रश्नाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्णायक उत्तर दिले, ते अस्पृश्यांच्या राजकीय व सामाजिक हक्कांसाठीची चळवळ उभारुन. बाबासाहेबांना जातिभेद व अस्पृश्यतेचे चटके लहानपणापासून सहन करावे लागले. अमेरिकेत उच्च शिक्षण घेऊन भारतात परतल्यावरही बडोद्यासारख्या संस्थानात त्यांना रहायला घर मिळाले नाही की सन्मानाची वागणूक मिळाली नाही. जातिभेदांच्या उतरंडीवर आधारित विषमतायुक्त समाजव्यवस्था ही त्याला कारणीभूत असल्याची जाणीव त्यांना सतत होत होती.

डॉ.बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठात सन 1916मध्ये 'जातींची उत्पत्ती, जडणघडण आणि विकास' या विषयावर लिहिलेल्या निबंधापासून ते सन 1956मध्ये बुद्ध धम्माचा स्वीकार करण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी समतेसाठी उभारलेल्या लढ्याचे अंतःसूत्र आपल्याला दिसते. ही लढाई अस्पृश्यतेच्या निवारणाची, मूलभूत मानवी हक्कांची, समतायुक्त समाजाच्या उभारणीची आणि राष्ट्राच्या घडणीची असल्याचे स्पष्ट भान त्यांच्याकडे होते. त्यामुळेच महाडच्या सत्याग्रहाची 'धर्मसंग्राम' अशी मांडणी करताना या लढाईत आपल्याबरोबर जे येतील, त्या सर्वांना सोबत घेण्याची भूमिका त्यांनी ठेवली.

मुंबई प्रांतिक सभेत रावबहादूर सी. के. बोले यांच्या पुढाकाराने सार्वजनिक शाळा, धर्मशाळा व पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा ठराव सन 1923मध्येच संमत झाला होता. याला अनुसरून महाडचे नगराध्यक्ष सुरबानाना टिपणीस यांनीही नगरपरिषदेत तसा ठराव केला होता. सन 1924मध्ये बहिष्कृत हितकारिणी सभेच्या स्थापनेनंतर बाबासाहेबांनी या प्रश्नावर आंदोलन करायचे ठरवले, तेव्हा त्यांनी महाडच्या चवदार तळ्याची सत्याग्रहासाठी निवड केली.त्यासाठी 19 व 20 मार्च 1927 रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे आयोजन करण्यात आले, तेव्हा हजारो अस्पृश्य बांधवांबरोबरच स्वतः टिपणीस, अनंतराव चित्रे, गंगाधर सहस्रबुद्धे, बापूसाहेब जोशी, तुळजाराम मीठा, भाईशेठ वडके, शांताराम पोतनीस आदी मंडळींचा त्यात हिरीरीने सहभाग होता. ज्या तळ्यावर गुरेढोरे व अन्य धर्मीयांनाही पाणी पिण्याची मुभा होती, तिथे अस्पृश्यांना मात्र येण्यास बंदी होती. ती झुगारून बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली हजारो अनुयायी चवदार तळ्याच्या काठी आले आणि त्याचे पाणी पिऊन आपला माणूसपणाचा मूलभूत हक्क प्रस्थापित केला. यामुळे संतप्त झालेल्या सनातन्यांनी वीरेश्वर मंदिरात हे लोक आता घुसतील, अशी आवई उठवून परतणाऱ्या सत्याग्रहींवर हल्ला चढवला. अनेकांची डोकी फुटली. मंडपातील जेवणातही माती कालवण्यात आली. मात्र, बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना शांत राहण्यास बजावल्यानेच पुढचा दुर्धर प्रसंग टळला होता. डॉ. बाबासाहेबांनी 'बहिष्कृत भारता'तील लेखांमध्ये आणि या काळातील भाषणांमध्ये आपली भूमिका रोखठोकपणे मांडली होती. या लेखाच्या मर्यादेत त्याचा व्यापक वेध घेणे शक्य नाही. परंतु, ही चळवळ केवळ अस्पृश्यांच्या आत्मोद्धाराची नसून, मानवधर्मोद्धाराची असल्याचे त्यांनी ठासून सांगितले आहे. आपले हे कार्य लोकसंग्रहाचे आहे, असे सांगून बाबासाहेब लिहितात, "अस्पृश्यतेमुळे केवळ अस्पृश्यांचेच नुकसान झाले नसून, स्पृश्यांचे व देशाचेही अपरिमित नुकसान झाले आहे. ... त्यांना आत्मसामर्थ्य प्राप्त झाले, तर ते आपली उन्नती करतील व आपल्या पराक्रमाने, बुद्धीने, उद्योगाने देशाच्या भरभराटीस कारणीभूत होतील."

पुढे डिसेंबर 1927मध्ये महाडमध्ये झालेल्या परिषदेत मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. त्यासंबंधीचा ठराव गंगाधर सहस्रबुद्धे यांनी मांडला आणि त्यांच्याच हस्ते ही होळी करण्यात आली. मात्र, याच परिषदेत स्वतः डॉ. बाबासाहेबांनी "हिंदूमात्राचा जन्मसिद्ध हक्कांचा जाहीरनामा' मांडला, हे अनेकांना माहिती असत नाही. "सर्व माणसे जन्मतः समान दर्जाचीच आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाचीच आहेत", यासारखी या जाहीरनाम्यातील काही तत्त्वे पुढे भारतीय राज्यघटनेच्या रुपाने या देशाला पुढे नेणारी ठरली, याची नोंद घेणे त्यामुळेच आवश्यक ठरते, हे वेगळे सांगणे नकोच ! या प्रसंगीच्या एका भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणतात, "... यास्तव हिंदू समाज समर्थ करावयाचा असेल, तर चातुर्वर्ण्य व असमानता यांचे उच्चाटन करून हिंदू समाजाची रचना एकवर्णत्व व समता या दोन तत्त्वांच्या आधारे केली पाहिजे. अस्पृश्यता निवारणाचा मार्ग हा हिंदू समाज समर्थ करण्याच्या मार्गापासून भिन्न नाही. म्हणून मी म्हणतो की, आपले कार्य जितके स्वहिताचे आहे, तितकेच राष्ट्रहिताचेही आहे." महाडचे धर्मयुद्ध आणि इतरही अनेक निमित्त्यांनी बाबासाहेबांनी भारतीय समाज आणि हिंदू धर्माची कठोर चिकित्सा केली आहे. त्यामागे या देशातील सामाजिक ऐक्य दृढ व्हावे, हीच भावना आपल्याला सातत्याने दिसते. तत्कालीन समाजाला त्याचे भान अनेकदा असत नाही. चवदार तळ्यावर सत्याग्रह करून परतणाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या महाडमधील तत्कालीन लोकांनाही ते नव्हते. पण, कालांतराने डॉ.बाबासाहेबांच्या कार्याची व्यापकता व महत्त्व लक्षात आल्यानंतर याच महाड नगरपरिषदेने सन 1940 आणि 1942 मध्ये सन्मानपत्र देऊन त्यांचा दोनदा सत्कार केला, याचीही नोंद आवर्जून घेतली पाहिजे. (विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी महाड चवदार तळे सत्याग्रह दिन तथा भारतीय सामाजिक सबलीकरण दिन निमित्त समस्त भारतीय बांधवांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी ॥।॥

**- संकलन व सुलेखन -**
**दिनविशेषकार-**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी,w**
**व्हॉट्सॲप- 9423714883.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

90 लाख 34 हजार पात्र शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ होणार असल्याचेही ते म्हणाले आहेत.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर नमो शेतकरी महासन्मान निधी योजना आखण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य म्हणून प्रति शेतकरी दरवर्षी रु. 6,000 अनुदान दिले जाते. तर यातच राज्य शासनाकडून आणखी रु. 6,000 इतकी भर घालण्यात आली आहे. या दोन्ही योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रतिवर्षी रु. 12,000 इतकी थेट मदत केली जाते.केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा 22 वा हप्ता दिनांक 13 मार्च 2026 रोजी वितरीत केला होता. पण यानंतर राज्य सरकारकडून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा आठवा हप्ता वितरीत करण्याच्या हालचाली सुरु झाल्या होत्या. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात जमा होईल अशी शक्यता होती. मात्र वित्त विभागाच्या निधीच्या अडचणीमुळे नमोचा आठवा हप्ता अडकला. दरम्यान आतापर्यंतच्या सात हप्त्यांमधून राज्यातील पात्र लाखो शेतकऱ्यांना थेट लाभ मिळाला असून आठव्या हप्त्यामुळेही शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

-----------------------------------

म जमा केली आहे. या प्रकरणी चार जणांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

अन्य आरोपींचा तपास सुरु आहे. या आरोपींनी लातूर येथील मार्केट यार्ड शाखेत ॲक्सीस बँकेत पाच खाती उघडली आहेत. ट्रस्ट माजलगाव येथील आणि बँक खाते लातूरमध्ये, असा प्रकार झाला आहे. या संस्थेची सविस्तर चौकशी सुरु आहे. रक्कम जमा केलेल्या लोकांना पुन्हा पैसे देण्याचा निर्णय चौकशीनंतर घेतला जाईल, अशी माहिती गृह राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी चर्चेत सहभाग घेत, संबंधित वादग्रस्त संस्थेच्या खात्यावर दावत- ए- इस्लामी या आंतराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या वादग्रस्त संस्थेने 25 लाख रुपये जमा केले आहेत. काही रक्कम अन्य खात्यांत वळविली आहे. काही रक्कम काढली आहे. राज्यातील 18,500 देणगीदारांना काही रक्कम चेकद्वारे, ड्रॉप बॉक्सद्वारे दिली आहे. त्यामुळे देणगीदारांचा शोध सुरु आहे.

संस्थेने परदेशातील वादग्रस्त संस्थांकडून पैसा घेतला आहे. संस्थेने देशविघातक कारवाया केल्याचा संशय बळावल्यामुळे दहशतवाद विरोधी पथकाने चौकशी सुरु केली आहे. सर्व खाते बंद केली आहेत. चौकशी अंती कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

----------------------------------

मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रदूषण कमी करण्यासाठी तांत्रिक सुधारणा, धूळ नियंत्रण, स्वच्छता उपाययोजना आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करण्यावर शासनाचा भर आहे. चंद्रपूरमधील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मी स्वतः भेट देणार असल्याचेही मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले.

राज्यातील उद्योगांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमित पाहणी करण्यात येत असून, पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींवर नियमांनुसार कडक कारवाई केली जाते.

मंडळाकडून उद्योगांची वेळोवेळी तपासणी करून पर्यावरणीय नियमांचे पालन होत आहे की नाही, याची पडताळणी केली जाते. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावली जाते. तसेच आवश्यकतेनुसार अंतरिम निर्देश व प्रस्तावित निर्देश जारी करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

----------------------------------------

कराड करत असून, त्यांच्या पुढाकारातून दर्जेदार आणि विश्वासार्ह उत्पादनांची हमी ग्राहकांना दिली जाणार आहे. उद्घाटन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

@@@@@@@@@

चौकट

हा कार्यक्रम नाथ टॉकीज रोड, ट्रेन्डस् शोरुम समोर, परळी वैजनाथ येथे होणार आहे. या डेअरीमार्फत ग्राहकांना दूध, दही, लस्सी, ताक, पनीर, तूप, खवा, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, क्रिम आदी विविध दर्जेदार उत्पादने उपलब्ध होणार आहेत. या उपक्रमामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळण्यासोबतच परळीकरांना शुद्ध दुग्धजन्य पदार्थांचा विश्वासार्ह पर्याय उपलब्ध होणार आहे.

----------------------------------------

सहाय्यता निधीचे वितरण केले जाणार असल्याची माहिती नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी दिली आहे.

परळी वैजनाथ शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जात असून केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना 2.0 अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याचे वितरण करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत परळी वैजनाथ शहरातील 677 पात्र लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पाडव्याच्या शुभमुहूर्तावर देण्यात येणार आहेत. या निमित्ताने लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर परळी वैजनाथ येथे पाडव्याच्या दिवशी दि.19 रोजी सकाळी 11.30 वाजता राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे धनादेश/अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालय उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे आदीसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजना 2.0 ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच निम्न व मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांना सुरक्षित व पक्के घर उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य दिले जाते. पहिला हप्ता मिळाल्यानंतर घरबांधणीच्या कामांना गती मिळून लाभार्थ्यांना लवकरात लवकर स्वतःच्या घरात राहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर रमाई घरकुल आवास योजनेच्या नवीन मंजूर दोनशे प्रस्तावांचा शुभारंभ आणि 546 दिव्यांगांना सहाय्यता निधीचे वितरण केले जाणार आहे. नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने यासाठी विशेष नियोजन करण्यात आले असून लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित करण्यात आली आहे. निधीचे वितरण पारदर्शक आणि वेळेवर व्हावे यासाठी प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. शहरातील झोपडपट्टीमुक्ती व "सर्वांसाठी निवारा" या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.अनेक वर्षांपासून स्वतःच्या घराच्या प्रतीक्षेत असलेल्या कुटुंबांना या योजनेमुळे मोठा दिलासा मिळाला असून पहिल्या हप्त्याच्या वितरणानंतर परळी शहरात मोठ्या प्रमाणावर पक्क्या घरांच्या उभारणीला गती मिळणार आहे. त्याचबरोबर रमाई आवास योजनेच्या अंतर्गत उद्दिष्ट देण्यात आलेल्या 200 नवीन प्रस्तावांचा शुभारंभ होणार आहे. दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या सहाय्यता निधीचे वितरणही या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास मोठी संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण , बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, मुख्याधिकारी पी.एन. निगळ, उप मुख्याधिकारी संतोष रोडे, तसेच सर्व सभापती, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांनी केले आहे.

----------------------------------

दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर केल्याची हजारो प्रकरणे तपासली जात असल्याचेही बावनकुळे म्हणाले आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना या घोटाळ्याबद्दल सविस्तर माहिती दिली. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "महसूल संहिता एमएलआरसी कोडमध्ये 155 व्या कलमात तहसीलदाराला एक अधिकार आहे, ज्यामध्ये शुद्धलेखनात जर चूक झाली तर दुरुस्त करता येते. म्हणजे एखाद्या नावात चूक झाली किंवा आडनावात चूक झाली तर ती दुरुस्त करण्याचा अधिकार तहसीलदारांना आहे. पण यांची जमीन त्यांच्या नावाने करून देणे 155 च्या नियमात बसत नाही, अशी वेगवेगळ्या पद्धतीची प्रकरणे 155 खाली आढळली आहेत. पुणे विभागात आम्ही 36 हजार प्रकरणं आम्ही ओळखली आहेत. त्यामधील जवळपास 3 हजार प्रकरणे आम्ही तपासली आहेत. जवळपास 500 प्रकरणांमध्ये गंभीर दोष आढळून आले आहेत," असे बावनकुळे म्हणाले.

विभागीय आयुक्त, नाशिक यांची एक समिती आम्ही तयार केली होती. या समितीने हा संपूर्ण रिपोर्ट शासनाला दिला आहे. काय कारवाई करावी या शिफारसी देखील यामध्ये आहेत, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

--------------------------------------

मालवली. मृत्यू समयी त्यांचे वय अंदाजे 90 वर्ष होते. त्यांचा अंत्यविधी बुधवार दि. 18 मार्च 2026 रोजी सकाळी 11 : 00 वाजता सार्वजनिक स्मशानभूमी वैकुंठ धाम येथे अतिशय शोकाकुल वातावरणात पार पडला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. माने परिवाराच्या दुःखात दैनिक संघर्षनेता परिवार सहभागी आहे.

----------------------------------

पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या विशेष उपक्रमाअंतर्गत प्ले ग्रुप, नर्सरी, एलकेजी व यूकेजी या वर्गांमध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला पूर्णपणे मोफत "Student School Kit" देण्यात येणार आहे. या किटमध्ये पुस्तके, स्कूल बॅग, रेग्युलर व स्पोर्ट्स युनिफॉर्म, शूज तसेच आधुनिक शिक्षणाला पूरक असलेले स्टुडंट ॲप यांचा समावेश आहे. त्यामुळे पालकांचा आर्थिक भार कमी होऊन विद्यार्थ्यांना सुरुवातीपासूनच संपूर्ण शैक्षणिक सुविधा मिळणार आहेत.

शाळा प्रशासनाने सांगितले की, बालवयातच गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्याचा आमचा उद्देश असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. गुढी पाडव्याच्या दिवशीच मर्यादित असलेली ही ऑफर म्हणजे पालकांसाठी एक सुवर्णसंधीच ठरत आहे."आपल्या मुलांच्या उज्ज्वल शिक्षणाची पहिली पायरी विश्वासाने आणि योग्य दिशेने टाका," असे आवाहन शाळेच्या वतीने करण्यात आले असून इच्छुक पालकांनी त्वरित प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असेही सांगण्यात आले. अधिक माहितीसाठी कावेरी प्लाझा रोड, रजिस्ट्रि ऑफिससमोर, जयनगर, परळी-वैजनाथ मोबा. 9226831212 / 9021830824 येथे संपर्क साधावा.

चौकट

बचपन प्ले स्कूलमध्ये शिक्षणासोबतच संस्कार व सर्जनशीलतेवर भर देणार - प्रा. आर.एस. बांगड

लहान वयात मुलांना योग्य दिशादर्शन व संस्कार मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बचपन प्ले स्कूलमध्ये आम्ही शिक्षणासोबतच संस्कार व सर्जनशीलतेवर भर देत आहोत. 'गोल्डन ॲडमिशन डे'च्या माध्यमातून पालकांना दर्जेदार शिक्षण सुलभ व्हावे, हा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक शिक्षणपद्धती आवश्यक -प्रा. कैलास घुगे

आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी आधुनिक व आनंददायी शिक्षण पद्धती आवश्यक आहे. आमच्या शाळेत खेळातून शिक्षण (Learning by Playing) या संकल्पनेवर भर दिला जातो. गुढी पाडव्याच्या निमित्ताने दिलेली ही ऑफर पालकांसाठी मोठी संधी असून त्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. कैलास घुगे यांनी केले आहे.

## पान 4 वरुन

न समाजातील स्त्रीयांची स्थिती व त्यावर उपाय यावर विचारमंथन होईल. याचबरोबर महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत, साहीत्यकार, दै सकाळ ये संपादक उत्तम कांबळे यांचे डॉ आंबेडकर यांचा मंत्री म्हणून कार्यकाळ: चिंतन तर दि27 एप्रील रोजी बुद्ध व भिमगीते यावर शालेय मुलां मुलींचे समुह डान्स *जल्लोष भिमजयंतीचा हा कार्यक्रम होईल

वरिल सर्व कार्यकृम रेल्वे स्टेशन मैदानात दररोज सांय.7:00 वा सुरु होऊन रात्री11 पर्यंत चालतील. ऐनवेळी काही वक्त्यांच्या विषयात बदल होऊ शकेल, फायनल विषय पत्रिका दि 1 एप्रील पर्यंत जाहिर केली जाईल, असे संयोजन समितीने सांगितले आहेतरी परळी व तालुक्यातील सर्व आंबेडकरवादी जनतेने वरिल सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून सर्व कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन *परळी भिमजयंती महोत्सव2026* च्या संयोजन समितीने केले आहे.

-----------------------------------

पदाची गरिमा आणि जबाबदारीउपराष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत सभागृहाचे कामकाज चालवण्याची जबाबदारी अनुभवी सदस्यांवर सोपवली जाते. निष्पक्षता, नियमांचे पालन आणि गोंधळातही संयम राखण्याचे कसब रजनीताईंनी काल दाखवून दिले. एका मराठी महिला नेत्याला मिळालेला हा सन्मान राज्यातील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरला आहे.

--------------------

व कामगार वाऱ्यावर सोडून दिले, शेतकऱ्यानी आपला ऊस जानेवारी, फेब्रुवारी मार्चमध्ये देऊन आतापर्यंत 338260.439 मे.टन गळप करण्यात आले आहे,परंतु सुरुवाततीचे जवळपास 50000 मे टन ऊसचे बील शेतकऱ्यांना दिले आहे, तसेच पाच पंधरवड्याचे ऊस बील थकवण्यात आले आहे,नियमा प्रमाणे ऊसाचे बील 15 दिवसात दिले पाहिजे,आर आर सी कार्यवाही, साखर आयुक्त पुणे यांनी ओंकार साखर कारखाना प्रा लि पांगरी विरुद्ध प्रस्तावित करण्यात यावी व विलंबाच्या कालावधीचे बील बँक व्याजासह शेतकऱ्यांच्या खात्यात तत्काळ जमा करण्यात यावे तसेच कामगारांचा जानेवारी, फेब्रुवारी महिन्याचा पगार तात्काळ कामगारांच्या खात्यात जमा कराव अन्यथा शेतकरी व कामगार यांचे आंदोलन उभा करून शासनाकडे तक्रार दाखल करण्यात येईल असा इशारा ॲड परमेश्वर गित्ते यांनी दिला आहे.

-----------------------------------

विजयप्रकाश किसनराव ठोंबरे यांनी संगनमत करून या सर्व 464 जणांना, त्यांच्या परवानगीशिवाय सूतगिरणीच्या रेकॉर्डवर सभासद म्हणून दाखवले. एवढेच नाही तर ही बनावट यादी प्रादेशिक उपायुक्त, वस्त्रोद्योग (संभाजीनगर) यांच्या कार्यालयातून प्रमाणित करून घेऊन शासनाची आणि संबंधित विद्यार्थ्यांची फसवणूक केली. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर पीडितांनी संभाजीनगर येथे तक्रार केली होती. त्यानंतर ठोंबरे यांनी हृषिकेशचे नाव यादीतून वगळले असले, तरी शेकडो विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांचा असा वापर करणे हा गंभीर गुन्हा असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी विजयप्रकाश ठोंबरे आणि राजकुमार वाव्हळे यांच्यासह त्यांना मदत करणाऱ्यांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, या घोटाळ्यामागे नक्की काय उद्देश होता, याचा तपास आता सुरु झाला आहे. विजयप्रकाश ठोंबरे हे केजच्या माजी आमदार संगीता ठोंबरे यांचे पती आहेत. 2017 मध्ये हा घोटाळा झाला होता तेव्हा संगीता ठोंबरे या भाजपकडून आमदार होत्या. काही दिवसांपूर्वीच त्यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला आहे.

--------------------------------------

आडबंगीनाथ, मिरावली पहाडावरील मिनीनाथ, जानपीर येथील जालिंदरनाथ आणि हिवरा येथील रेवननाथ (रोडागिरी) अशी नाथांची स्थाने या परिसरात असल्याचा उल्लेख नवनाथांच्या ग्रंथांत आढळतो.

गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी विविध ठिकाणांहून कावडीने आणलेल्या गंगेच्या पाण्याने श्री मच्छिंद्रनाथांच्या समाधीला स्नान घातले जाते. त्यानंतर समाधीला चंदनाचा लेप लावला जातो. या चंदनाचा सुगंध परिसरात दरवळत असतो. रात्री बारा वाजल्यानंतर भाविकांसाठी समाधी दर्शनासाठी खुली केली जाते.पाडव्याच्या पहाटे पाच वाजता आरतीनंतर समाधी पुन्हा झाकली जाते.

पुढील वर्षीच्या गुढीपाडव्यापर्यंत समाधी बंदच ठेवली जाते. समाधी उघडी असताना पाडव्याच्या आदल्या दिवशी रात्री महिलांना दर्शनासाठी बंदी असते, तर पुरुषांनाही स्नान करूनच समाधी दर्शन दिले जाते. त्यामुळे या दिवशी भाविकांमध्ये विशेष उत्साह आणि श्रद्धेचे वातावरण असते.नाथ संप्रदायात श्री मच्छिंद्रनाथांना आद्य नाथाचार्य मानले जाते.

'कौलज्ञाननिर्णय' या प्राचीन संस्कृत ग्रंथाचे जनकत्वही विद्वानांच्या मते त्यांच्याकडे जाते. नाथपंथाच्या सिद्ध परंपरेत त्यांचे स्थान अत्यंत आदरणीय मानले जाते.श्री गोरक्षनाथांचे गुरु म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.श्रीक्षेत्र मायंबा येथील मच्छिंद्रनाथ गडावर नाथांनी संजीवन समाधी घेतली असल्याने येथे भक्तांना आध्यात्मिक चैतन्याचा अनुभव येतो. गडावर अखंड धुनी पेटलेली असते, ती कधीच विझत नाही. समाधीच्या पाठीमागे धोंडाई देवीचे मंदिर असून नाथांनी तिला आपली बहीण मानल्याची परंपरा सांगितली जाते. डोंगराखाली 'देव तळे' नावाचा तलावही आहे.

-----------------------------------------

असंख्य मुस्लीम बांधवानी या ईफ्तार पार्टीस उपस्थित राहून सामाजिक सलोखा व आपसी भाईचारा वाढावा या अनुशंगाने हजेरी लावून इफ्तार पार्टीचा आनंद घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कॉ. मदन वाघमारे कॉ.प्रकाश उजगरे,कॉ.महादेव शेरकर, कॉ.मोइदीन शेख,कॉ.वाजेद पठाण, कॉ.मदन राठोड,कॉ.अहेमद शेख,कॉ.नजीर बागवान, कॉ.इस्माईल शेख, कॉ.अप्पा तरकसे, कॉ.विशाल देशमुख, कॉ. प्रशांत मस्के,कॉ.सिद्राम सोळंके,विलास उजगरे इत्यादीनी मेहनत घेतली.

---------------------------------------

सातपुते या वेळी उपस्थित होते

अक्षय बुरांडे यांच्या पुढील शासकीय कारकिर्दी साठी सर्वांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

----------------------------------------------

करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने दिनांक 20 तीन 2026 रोजी सकाळी दहा वाजता छत्रपती संभाजी चौक परळी वैजनाथ इतके कॉर्नर या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन ठेवले आहे या आंदोलनाला प्रदूषण बाधित सर्वच नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष गौतम साळवे,तालुका महासचिव ज्ञानेश्वर गीते यांनी केले आहे.

----------------------------------------------

पालखी मार्गावर वाहतुकीचा मोठा ताण वाढला आहे. मात्र धारूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते धुनकवड पाटी हा सुमारे 12 किलोमीटरचा रस्ता अद्याप अरुंदच ठेवण्यात आला आहे. त्यामध्ये जवळपास 3 किलोमीटरचा धोकादायक घाट असून एका बाजूला खोल दरी आणि दुसऱ्या बाजूला अरुंद वळणे असल्याने या मार्गावर अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

आठवड्याला दोन ते तीन वाहने दरीत कोसळण्याच्या घटना घडत असल्याचे वाहनचालक सांगतात.मंगळवारी सिमेंट वाहतूक करणारा सोळा चाकी ट्रक हा आंध्रप्रदेशातून तेलगावकडे येत असताना धारूर घाटातील एका धोकादायक वळणावर नियंत्रण सुटले. ट्रकने तटरक्षक भिंत तोडत थेट दरीत कोसळत भीषण अपघात झाला.

या अपघातानंतर घटनास्थळी मोठ्या प्रमाणात वाहनधारक व नागरिकांची गर्दी झाली होती.या घाटात वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घाटाचे रुंदीकरण आणि सुरक्षेच्या उपाययोजना अद्याप प्रलंबित असल्याने प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत घेऊन या मार्गावरून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या घाटाचे तत्काळ रुंदीकरण करून सुरक्षित प्रवासाची व्यवस्था करावी, अशी मागणी वाहनचालक, प्रवासी तसेच स्थानिक नागरिकांकडून जोर धरत आहे.रुंदीकरणाचे काम मंजूर झाल्याचे सांगितले जात असले तरी ते प्रत्यक्षात कधी सुरु होणार ? हा प्रश्न आहे.

-----------------------------------------------

तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.मंत्रालयात झालेल्या चर्चेदरम्यान संबंधित प्रकरणाचा तातडीने विचार करून मयतांच्या कुटुंबीयांना शक्य तितक्या लवकर शासकीय मदत देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद देण्यात आल्याची माहिती अनिल राधे कांबळे यांनी दिली.

ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा व त्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी आपण सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

---------------------------------------

या लोकार्पण कार्यक्रमास उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, सभापती नागेश डिगे, नगरसेवक संभाजीराव शिंदे, श्रीकांत माळवदे, सुरेशराव दिवटे, रामेश्वर पाटोळे, व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, संचालक मंडळ, पत्रकार, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी अंत्ययात्रेसाठी लागणारी तिरडीही उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यावर पतसंस्थेच्या वतीने दोन स्टीलच्या तिरड्या देण्यात येतील, अशी घोषणा व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांनी केली.

यापूर्वी पतसंस्थेच्या सभागृहात वर्धापन दिनानिमित्त चौंडेश्वरी मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या उपक्रमामुळे रामलिंग पतसंस्थेची सामाजिक बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

-------------------------------------

150 असल्याचे सांगितले जात असून यामुळे सदरील नियुक्ती केलेल्या शिक्षक हे बीएलओ म्हणून काम करीत असल्यामुळे सदरील मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत असल्याचे पालकातून सांगितल्या जात आहे तसेच या शाळेतील शिक्षक श्री क्षीरसागर व्ही के सहशिक्षक असून ते शारीरिक अपंग म्हणजे त्यांना पॅरलेस आजाराने पछाडले असतानाही एका जागेवर बसून विद्यादानाचे काम करतात परंतु त्याही शिक्षकाची बी एल ओ म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे यामुळे एकाच शिक्षण सेवकावर या शाळेचा पूर्ण भर पडला असून यातील अपंग असलेल्या शिक्षकाची बी एल ओ म्हणून केलेली तात्काळ रद्द करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी परळी तहसीलदार व गटशिक्षणाधिकारी यांना लेखी पत्र दिल्याचेही प्रसिद्धिपत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

------------------------------------------

आले आहे.स्पर्धेचे नियम आणि स्वरूपानुसार विजेत्यांची निवड करणे अनिवार्य आहे म्हणूनच हजारो उत्तमोत्तम साहित्यामधून सर्व उत्कृष्ट लेखकांची निवड करण्याची आव्हानात्मक कार्य प्रतिलिपीच्या परीक्षक मंडळांने मोठ्या परिश्रमानंतर पूर्ण केले आहे

लवकरच प्रतिलिपी च्या वतीने प्रदीप कुलकर्णी यांना बक्षिसाचे वितरण करण्यात येणार आहे. या बक्षिसाच्या रक्कमेबरोबरच एक ट्रॉफी व साहित्य सन्मानपत्र प्रदान केले जाणार आहे.

प्रदीप कुलकर्णी यांच्या एकूण 17 कादंबऱ्या प्रतिलिपी च्या व्यासपीठावर प्रकाशित झाल्या असून त्यापैकी "प्रेमात पडायचे होते पण" ही कादंबरी पुस्तक रुपाने प्रतिलिपीच्या वतीने प्रकाशित करण्यात आली आहे.सध्या सुनवास, जुळलेली मन भंगलेली स्वप्न, दुसऱ्या होकाराची चूक या तीन कादंबऱ्या क्रमशः प्रतीलीपीवर प्रकाशित होत आहेत त्यापैकी "सुनवास" ही कादंबरी चार लाखापेक्षा जास्त वाचकांनी वाचली असून तिने लोकप्रियतेचे यशोशिखर गाठले आहे,त्यांच्या या यशाबद्दल त्यांच्या अनेक चाहत्यांनी, वाचकांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.प्रदीप कुलकर्णी यांच्या या यशामध्ये त्यांच्या असंख्य वाचकांचा मोलाचा वाटा आहे त्याबद्दल त्यांनी सर्व वाचकांचे मनापासून आभार मानले आहेत

----------------------------

पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कैलास बाबूराव उघडे (वय 55, रा. अर्धामसला) हे सिरसदेवी येथील एका खासगी माध्यमिक विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत होते. 14 मार्च रोजी सकाळी 10:30 च्या सुमारास त्यांनी आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या खोलीत दोन सविस्तर चिठ्ठ्या लिहून ठेवल्या होत्या, ज्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याप्रकरणी मयताचे वडील बाबूराव गोलाजी उघडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, तलवाडा पोलिसांनी 17 मार्च रोजी गोरकर आणि श्रीराम शेळके यांच्याविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

---------------------------------------------

## देगलूरचे गुणवंत क्रीडा कार्यकर्ता- नारायणराव उपलंचवार




देगलूर प्रतिनिधी/धनाजी जोशी देगलूर व परिसरात व्हॉलीबॉल या खेळाद्वारे शहराचे नाव सर्वदूर महाराष्ट्र राज्यात नाही तर देशात पोहचविले आहे.असे देगलूर भुषण निष्णांत खेळाडू नारायणराव उपलंचवार वयाच्या 75 व्या वर्षात पदार्पण करीत आहेत.

या निमित्ताने त्यांचा परिचय करुन देणारा लेख...

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने जिल्हा क्रीडा पुरस्कारांतर्गत गुणवंत क्रीडा कार्यकर्ता पुरस्काराने गौरविण्यात आलेले देगलूर येथील खेळाडू मा. नारायणराव उपलंचवार होत.

उपलंचवार हे मूळचे करडखेड ता. देगलूर येथील रहिवासी आहेत. ग्रामीण जीवनापासूनच त्यांना खेळाची विशेष आवड होती. लहानपणापासूनच खेळाची आवड असल्यामुळे त्यांच्या अंगातील लकब व लवचिकता पाहून त्यांना व्हॉलीबॉल या खेळात लक्ष देण्याचा सल्ला देण्यात आला. त्यानुसार त्यांनी व्हॉलीबॉल या खेळाकडे अधिक लक्ष देण्यास सुरुवात केली.

केवळ व्हॉलीबॉल या खेळाचा त्यांनी जणू ध्यासच घेतला. त्यामुळे शालेय स्तरापासून ते विद्यापीठ स्तरापर्यंत अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी बक्षिसे मिळवली.

20 मार्च 1951 रोजी जन्मलेल्या उपलंचवार यांचे पदवीचे शिक्षण 1978 साली कला शाखेत पूर्ण झाले.

आपल्या उपजीविकेसाठी उपलंचवार यांनी विशेष खेळाडू म्हणून 1978 मध्ये शंकरनगर येथील गोदावरी सहकारी साखर कारखान्यात नोकरी स्वीकारली. पुढे त्यांनी कारखान्याच्या संघाचे नेतृत्व करत अनेक सुवर्णचषक व रौप्यपदके मिळवून संघाला नावलौकिक मिळवून दिला.

व्हॉलीबॉल खेळात त्यांनी प्रशिक्षित केलेल्या संघाने राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच ज्युनिअर गटातही रौप्यपदक मिळविले. त्यांच्या मार्गदर्शनाखालील संघांनी राज्य आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला.

नवोदय विद्यालयाच्या संघालाही त्यांनी सुवर्णपदक मिळवून दिले.

1985 पासून श्री. उपलंचवार यांनी राज्य व राष्ट्रीय पंच (Referee) म्हणून कार्य करण्यास सुरुवात केली.

1986 मध्ये औरंगाबाद येथे झालेल्या राष्ट्रीय ग्रामीण अजिंक्यपद स्पर्धेत तसेच महाराष्ट्र विरुद्ध रशिया या आंतरराष्ट्रीय सामन्यात त्यांनी पंच अधिकारी म्हणून काम केले.

तसेच 1994 मध्ये पुणे येथे झालेल्या राष्ट्रकुल सामन्यात त्यांनी पंच म्हणून विशेष कामगिरी बजावली.

1994–95 : आंध्र प्रदेश – सब ज्युनिअर व सीनियर व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धा

1996–97 : कलकत्ता – राष्ट्रीय स्पर्धा

1998–99 : चंद्रपूर – राष्ट्रीय सब-ज्युनिअर अजिंक्यपद स्पर्धा तसेच

1999–2000 : हैदराबाद – राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा

2001 : हरियाणा (गुडगाव) – राष्ट्रीय स्पर्धा

या स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या वतीने त्यांची अधिकारी म्हणून निवड झाली होती.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ तसेच परभणी येथील कृषी विद्यापीठ यांनी त्यांची प्रशिक्षक व सदस्य म्हणून निवड केली होती. सामना अधिकारी व पंच अधिकारी म्हणून त्यांनी उल्लेखनीय काम केले.

त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे राज्य संघटना व व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांनी त्यांना अधिकृत पंच अधिकारी म्हणून मान्यता दिली.

मराठवाड्यातील ग्रामीण भागातून त्यांनी अनेक खेळाडूंना प्रशिक्षण दिले आहे. खेळाचा प्रसार व विकास करण्यासाठी त्यांनी मोलाचे कार्य केले. देगलूर येथे व्हॉलीबॉल खेळ रुजविण्याचे श्रेय त्यांनाच जाते.

त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना 2017 ला देगलूर नगर भूषण म्हणून गौरविण्यात आले.

ग्रामीण भागात व्हॉलीबॉल खेळाला विशेष प्रोत्साहन मिळावे, कारण या खेळामुळे ग्रामीण पातळीवर व्यायाम आपोआप होतो. ग्रामीण स्तरावर विशेष प्रशिक्षक नेमून या खेळाचा व्यापक प्रसार होणे गरजेचे आहे अशी तळमळ व्यक्त करतात.

एखाद्या खेळाडूने किंवा कलावंताने केलेल्या कार्याला मिळणारी दाद ही त्याच्या आयुष्याची मोठी संपत्ती असते. त्यात एखादा पुरस्कार किंवा सन्मान मिळाला तर तो दुधात साखर पडल्यासारखा आनंद देणारा असतो.

देगलूर येथील व्हॉलीबॉलपटू नारायणराव उपलंचवार यांना असा सन्मान अनेक वेळा मिळाला आहे.

ते 75 व्या वर्षात पदार्पण करित आहेत. वाढदिवसानिमित्त त्यांना कोटी कोटी शुभेच्छा.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित परळीत परळी भिमजयंती महोत्सव2026 चे आयोजन

## ( उत्तम कांबळे, सोन्नर महाराज, भंते पय्यानंद, प्रबुद्ध साठे यांचे व्याख्यान व भिमसंध्या ऑकेस्ट्रा)





परळी(प्रतिनिधी):- विश्वभूषण डॉ बाबासाहेब आंबेडकरसार्वजनिक आदर्श जयंती उत्सव समिती परळी द्वारा आयोजित परळी भिमजयंती महोत्सव2026 चे यावर्षी चे आयोजन करण्यात आले असून, या निमित दि17 ते 27 एप्रील या दरम्यान परळी येथील रेल्वे स्टेशन येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा मैदान येथे विविध अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे परळी भिमजयंती महोत्सव समितीने एक पत्रकाद्वारे प्रसिध्द केले आहे डॉ बाबासाहेबाच्या जयंतीदिनी म्हणजे 14 एप्रील रोजी सकाळी 9:00 वा ध्वजारोहन व समता कँडल मार्च तर दि 17 एप्रील रोजी शामसुंदर महाराज सोन्नर* यांचे डॉ बाबासाहेब आंबेडकर, संविधान आणि संत विचार या विषयावर व्याख्यान होईल, तर दि21 एप्रील रोजी सुरेश रंजवे प्रस्तुत भिमसंध्या ऑकेस्ट्रा*तर दि.22 एप्रील रोजी पुणे येथील प्रबुद्ध साठे यांचे बहुजनांची धम्मदिक्षा म्हणजे घरवापसी होय*या विषयावर व्याख्यान होणार आहे याचबरोबर दि24 एप्रील रोजी भंते पय्यानंदथेरो, लातुर यांचे धम्म प्रवचन होईल त्यांचा विषय आहे बौद्ध धम्म: एक समतवादी आणि मानवतावादी विचारधारा तसेच दि25एप्रील रोजी औरंगाबाद येथील ॲड वैशाली डोळस यांचे बहुज पान 3 वर

# राजभवनाचा सन्मान : खा. रजनीताई पाटील राज्यसभेच्या 'पिठासीन अधिकारी' पदी विराजमान; महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद क्षण



प्रकाश मुंडे /केज तालुका प्रतिनिधी महाराष्ट्राच्या राजकारणातील ज्येष्ठ नेत्या खासदार रजनीताई पाटील यांना काल राज्यसभेत एका अत्यंत महत्त्वाच्या बहुमानाला सामोरे जाता आले. राज्यसभेच्या पिठासीन अधिकारी (Presiding Officer) म्हणून त्यांनी काल सर्वोच्च सिंहासनावरून सभागृहाचे यशस्वी संचालन केले.

संघर्षातून मिळालेला सन्मान काही काळापूर्वी याच सभागृहात रजनीताईंना निलंबनाच्या कारवाईला सामोरे जावे लागले होते. मात्र, काळाचा महिमा असा की, काल त्याच सभागृहाचे नियमन करण्याची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. त्यांनी या संधीचे सोने करत प्रश्नोत्तराचा तास, विधेयकांवरील चर्चा आणि सभागृहातील शिस्त अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हाताळली.

पान 3 वर

# ओंकार साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे ऊस बील व कामगारांचा पगार तात्काळ देण्याची मागणी:-

## ॲड परमेश्वर गित्ते



लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी उभारलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या पांगरी हा विक्री नंतर शेतकरी व कामगार यांचे जिवनात बदल होईल असे अनेकांना वाटले होते, परंतू ओंकार साखर कारखाना प्रा लि पांगरी ने ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे बील व कामगांराचे पगार जानेवारी फेब्रुवारी, मार्च चे दिले नाहीत, गुढीपाडवा व रमजान ईद सणासुदीच्या काळात शेतकरी व कामगार मेटाकुटीला आला असुन आंदोलनच्या तयारीत असल्याचे ॲड परमेश्वर गित्ते यांनी सांगितले आहे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी उभारलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना मर्या पांगरी हा आशिया खंडात उल्लेखनीय गाळप करुन नावलौकिक मिळविलेला कारखाना लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकाली मृत्यू नंतर व्यवस्थापनाला चालवता आला नाही, कर्जबाजारी करून,त्यांच्या संमतीने युनियन बँक ऑफ इंडिया तर्फे ओंकार साखर कारखाना प्रा लि पांगरी ला कवडी मोल भावात विक्री केला व शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेतला आहे असे सांगून शेतकरी पान 3 वर

# विद्यार्थ्यांचे जातवैधता प्रमाणपत्रे चोरून बीडमध्ये सूतगिरणी घोटाळा; माजी आमदार पतीविरुद्ध गुन्हा




बीड : जिल्ह्यातील 'लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी'मध्ये एक धक्कादायक फसवणुकीचा प्रकार समोर आला आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि नोकरीधारकांची जातवैधता प्रमाणपत्रे माहिती अधिकारात मिळवून, त्यांच्या संमतीशिवाय त्यांना परस्पर सूतगिरणीचे सभासद दाखवल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते अनिल कचरू तुरुकमारे यांच्या फिर्यादीवरून केज पोलिस ठाण्यात गिरणीचे तत्कालीन अध्यक्ष आणि लिपिकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, सूतगिरणीचे तत्कालीन लिपिक राजकुमार दयाराम वाव्हळे यांनी 2017 मध्ये जातपडताळणी समितीकडे माहिती अधिकारात अर्ज केला होता. जानेवारी ते मार्च 2017 या काळात ज्या 464 अर्जदारांनी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले होते, त्यांची प्रमाणपत्रे वाव्हळे यांनी हस्तगत केली. त्यात फिर्यादी तुरुकमारे यांचा मुलगा हृषिकेश याच्या प्रमाणपत्राचाही समावेश होता.

लिपिक वाव्हळे आणि सूतगिरणीचे तत्कालीन अध्यक्ष पान 3 वर

# वर्षातून एकदाच उघडते मच्छिंद्रनाथांची समाधी

## गुढीपाडव्याच्या यात्रेसाठी भाविकांची तयारी



कडा : बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील श्रीक्षेत्र मायंबा (सावरगाव) येथे नवनाथांपैकी आद्यगुरू श्री मच्छिंद्रनाथ महाराजांची संजीवन समाधी आहे. ही समाधी वर्षातून केवळ एकदाच गुढीपाडव्याच्या आदल्या रात्री उघडली जाते. त्यामुळे या दिवशी देशभरातून लाखो भाविक दर्शनासाठी मायंबा येथे येतात.

गर्भगिरीच्या डोंगर परिसरात नवनाथांचे वास्तव्य असल्याची परंपरा सांगितली जाते. त्यापैकी नगर जिल्ह्यातील मढी येथील कानिफनाथ, आष्टी तालुक्यातील मायंबा येथील मच्छिंद्रनाथ,कारखेल परिसरातील पान 3 वर

# किसान सभेकडून दावत-ए-इफ्तार संपन्न



परळी / प्रतिनिधीअखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पवित्र रमजान महिन्याच्या निमिताने सामाजिक सलोखा अबादित रहावा व सामाजिक एकजूट कायम टिकून राहवी या उद्देशाने रोजा ईफ्तार पार्टीचे आयोजन मंगळवार दि 17 रोजी करण्यात आले होते.या ईफ्तार पार्टीस किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ. ऑड.अजय बुरांडे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

रमजानचा महिना हा संयम, भक्ती आणि त्यागाचे प्रतीक असून समाजात एकात्मता, बंधुता आणि सौहार्द निर्माण व्हावे या उद्देशाने अखिल भारतीय किसान सभा बीड कडून तालुक्यातील सिरसाळा येथे दावत-ए-इफ्तार चे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी सिरसाळा गावचे तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष अय्यासोदीन इनामदार यांच्या हस्ते धार्मिक परंपरेनुसार किसान सभेचे कॉ.ऑड.अजय बुरांडे यांचा सन्मान करण्यात आला. या इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सामाजिक कार्यकर्ते शेख नसीब यांनी केले. या प्रसंगी कॉ.बालाजी कडबाणे,कॉ.खय्युम शेख सिरसाळा पोलीस स्टेशनचे एपीआय दहिफळे यांच्यासह सिरसाळा गावातील पान 3 वर

# श्री अक्षय ओमप्रकाश बुरांडे यांची भुमिअभिलेख अधिकारी पदावर नुकतीच निवड झाल्याबद्दल शाल श्रीफळ बुके देऊन सत्कार



श्री अक्षय ओमप्रकाश बुरांडे यांची भुमिअभिलेख अधिकारी पदावर नुकतीच निवड झाल्याबद्दल शाल श्रीफळ बुके देऊन स्वागत करताना आले या वेळी महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा तालुका अध्यक्ष महादेव इटके परळी नगरपरिषद शिक्षण समितीचे सभापती योगेश मेनकुदळे,भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर, भाजपा प्रदेश युवा मोर्चा सचिव ऍड अरुण पाठक महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभा परळी अध्यक्ष नितीन समशेटे वैद्यनाथ बँक संचालक महेश निर्मळे नगरसेवक अनंत इंगळे, वीरशैव विकास प्रतिष्ठान उपाध्यक्ष शिवकुमार केदारी भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुशील हरंगुळे श्री पान 3 वर

# परळी वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या व दाऊतपूर ग्रामपंचायतेच्या राखेच्या मनमानी कारभारा विरोधात

## होत असलेल्या रास्ता रोको आंदोलनास मोढ्या संख्येने उपस्थित रहा. गौतम साळवे- ज्ञानेश्वर गीते




परळी विद्युत केंद्राच्या वतीने जप्त केलेल्या राखेची टेंडर प्रक्रिया मुख्य अभियंता यांनी चुकीच्या पद्धतीने करून दाऊतपूर ग्रामपंचायतीला नाममात्र प्रति टन 177 रुपये घेऊन राख उचलण्याचे अधिकार दिले आहेत. हे अत्यंत चुकीचे असून यामुळे शासनाचा प्रचंड महसूल बुडाला आहे 2023 ला प्रति टन 353 रुपये भाव असताना 2026 ला प्रति टन 177 रुपये कशामुळे केला? हीच टेंडर प्रक्रिया सार्वजनिक व सर्वांना विश्वासात घेऊन केली असती तर शासनाला करोडो रुपयांचा फायदा झाला असता अशा चुकीच्या पद्धतीने एकाच ग्रामपंचायतला अधिकार देऊन मुख्य अभियंता इंगळे व संबंधित अधिकारी कर्मचारी यांनी प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे. याची चौकशी करून यांना तात्काळ निलंबीत करण्यासाठी व दावतपूर ग्रामपंचायत येणे दिलेल्या अधिकाराचा गैरवापर करून राख माफी यांनाच राख उचलण्याच्या पावत्या देऊन दावतपूरच्या मागासवर्गीयांना जातीय द्वेष भावनेतून डावलण्यात आलेले आहे या ग्रामपंचायतीची सुद्धा चौकशी करून यांच्यावर सुद्धा कारवाई पान 3 वर

# सिमेंटचा ट्रक दरीत कोसळला


## धारूर घाटात अपघातांची मालिका थांबेना; रुंदीकरणाचा प्रश्न अनेक वर्षांपासून रखडला



धारूर : शेगाव-पंढरपूर पालखी मार्गावरील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 548 सी वर असलेल्या धारूर-तेलगाव मार्गावरील धारूर घाटात अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. सोमवार (16 मार्च) रात्री सुमारे 10 वाजण्याच्या सुमारास आंध्र प्रदेशातून तेलगावकडे जाणारा सिमेंटने भरलेला मालवाहतूक ट्रक अवघड वळणावरून थेट दरीत कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने या अपघातात जीवितहानी झाली नाही; मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

सध्या शेगाव-पंढरपूर पान 3 वर

# मंत्रालयात ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांसाठी शासकीय मदतीची मागणी



माजलगाव (अनंत घडसिंगे ) : मंत्रालय, मुंबई येथे गावातील मयत ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांना शासकीय आर्थिक मदत मिळावी या मागणीसाठी अनिल राधे कांबळे (ऊसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष तथा ब्रम्हगावचे उपसरपंच) यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला.

यावेळी त्यांनी आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यालयातील सचिवांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

गावातील ऊसतोड मजूर रामकिसन मसाजी कांबळे, बाळू रामकिसन कांबळे व बाळासाहेब दासू कांबळे यांचे निधन झाले असून त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून पान 3 वर

# वडवणी वैकुंठधाम येथे अस्थी ठेवण्यासाठी लॉकरचे लोकार्पण

## रामलिंग पतसंस्थेचा वर्धापन दिनानिमित्त अभिनव उपक्रम



वडवणी, दि. 18 (प्रतिनिधी) : मानवी जीवनाच्या शेवटच्या टप्प्यावरही सन्मान आणि सुव्यवस्था मिळावी या उदात्त भावनेतून वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेने आपल्या 35 व्या वर्धापन दिनानिमित्त वैकुंठधाम (अमरधाम) येथे अस्थी ठेवण्यासाठी लॉकरची सुविधा उपलब्ध करून देत एक अभिनव सामाजिक उपक्रम राबवला आहे.

या लॉकरचे लोकार्पण नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, या सुविधेमुळे मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळणार असून समाजहिताच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे.

वैकुंठधाम येथे अस्थी विसर्जनापूर्वी सात दिवसांसाठी अस्थी ठेवण्याची प्रथा आहे. मात्र यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने नागरिकांना अस्थी कलश झाडाला बांधून ठेवण्याची वेळ येत होती. अनेकदा अशा कलशांची अदलाबदल होण्याच्या घटना देखील घडल्या आहेत. ही अडचण लक्षात घेऊन पतसंस्थेच्या संचालक मंडळाने 24 कप्प्यांचे कुलूपबंद लोखंडी लॉकर कपाट उपलब्ध करून दिले.


पान 3 वर

# परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील शाळेतील शिक्षकाची बी एल ओ म्हणून केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी.बालासाहेब जगतकर



परळी प्रतिनिधी -परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षकांची बी एल ओ म्हणून केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्ध प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की जिल्हाधिकारी बीड विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार सुरु असलेल्या मतदार यादी पुनर निरीक्षण मोहिमेसाठी शहरी व ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शिक्षकाची मतदान केंद्र स्तरीय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे परळी शहरातील भीम नगर जगतकर गल्ली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत फक्त शिक्षण सेवकावरच सदरील शाळेचा भार असून या शाळेत पाच वर्ग असून एकूण विद्यार्थी 100 ते पान 3 वर

# प्रदीप कुलकर्णी यांच्या वाड्याचे सावट या कादंबरीस प्रतिलिपी चे बक्षीस



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) -

सुप्रसिद्ध लेखक प्रदीप कुलकर्णी यांच्या वाड्याचे सावट या कादंबरीस प्रतिलिपी च्या वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे.

बेंगलोर येथील प्रतिलिपी या प्लॅटफॉर्म च्या वतीने प्रतिलिपी लेखन अवॉर्ड सीजन एक ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये आठ भाषांमधील हजारो लोकप्रिय लेखक आणि नवोदित लेखक यांनी सहभाग घेतला होता.

अनेक लेखकांनी बेस्ट सेलर कथांची निर्मिती या माध्यमातून केली आहे. या राष्ट्रीय स्तरावरील लेखन स्पर्धेने आपल्या देशात दडलेल्या अफाट प्रतिभेला एक भव्य व्यासपीठ मिळवून दिले आहे उत्कृष्ट साहित्याच्या निर्मिती बद्दल प्रतिलिपी च्या वतीने सर्व यशस्वी लेखकांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात पान 3 वर

# पगार बंद केल्याने मी संपवतोय जीवन...'; शिक्षकाची दोन पानी सुसाईड नोट लिहून आत्महत्या



गेवराई (जि. बीड) : "श्री. गोरकर सर आणि श्रीराम शेळके यांनी माझा फेब्रुवारीचा पगार बंद केला, त्यामुळे मी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडला आहे. हे दोन व्यक्ती माझ्या संसाराला कारणीभूत आहेत..." अशी हृदयद्रावक सुसाइड नोट लिहून अर्धामसला येथील एका 55 वर्षीय शिक्षकाने आपले जीवन संपवले. या घटनेने शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून, याप्रकरणी तलवाडा पान 3 वर